# विद्यार्थ्यांना पडलेल्या प्रश्नांचे उत्तर ग्रंथ देतात

देगलूर(प्रतिनीधी): विद्यार्थ्यांना अलीकडे एका क्लिकवर पुस्तक स्क्रीनवर जरी येत असले तरी डोक्यातील पडलेल्या प्रश्नांचे उत्तर ग्रंथालयात बसून वाचलेली ग्रंथच देत असतात असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा समर्थ वाचनालयाचे कार्यकारणी सदस्य डॉ सुरेंद्र आलूरकर यांनी केले.

ते देगलूर महाविद्यालय आणि श्री समर्थ वाचनालय देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालय दिनाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ होते.

यावेळी व्यासपीठावर समर्थ वाचनालयाचे कार्यवाह अविनाश देशपांडे, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य देवेंद्र मोतेवार उपस्थित होते. आज काल आंतरजालाच्या साह्याने एका क्लिकवर ज्ञानाचे भंडार उघडले जात असले तरीही, ग्रंथांच्या माध्यमातून मिळणारे ज्ञान हे चिरंतन राहते.



त्यामुळे ग्रंथांचे पालन करणे आवश्यक आहे .प्राचीन काळात ऋषीमुनींनी लिखित ग्रंथातून समृद्ध केलेले ज्ञान आपल्या पूर्वजांनी तेवढ्याच क्षमतेने जतन करून ठेवले .म्हणून आज आपणास या ज्ञानाचे आकलन होत आहे .विद्यमान परिस्थितीत ग्रंथालये व ग्रंथपाल हे ज्ञान जतन करण्याचे महत्त्वाचे काम करीत आहेत.

विद्यार्थी जीवनात पुस्तकाला मोठे महत्त्व आहे खाजगी असो की शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत असताना पुस्तकच आपल्याला दिशा देण्याचे काम करीत असतात सोशल मीडियाने जरी आज मोठ्या प्रमाणात जागा घेतल्याचे चित्र असले तरी ग्रंथ वाचनातूनच व्यक्तिमत्व विकास होत असतो असे डॉ आलूरकर यांनी मत व्यक्त केले. प्रारंभी ग्रंथालयाचे जनक डॉ एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन देवेंद्र मोतेवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल कदम आणि शिंदे यांचा ग्रंथपाल दिना निमित्त विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात देगलूर शहर व परिसरात समर्थ वाचनालय व देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय हे ज्ञानाचे सांस्कृतिक केंद्र बनले आहे असे मत प्रा. संजीव गणगांव यांनी व्यक्त केले.

या वेळी देवेंद्र मोतेवार यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रा.साईनाथ शिंदे तर आभार प्रा.डॉ.संतोष येरावार यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, डॉ.लक्ष्मण सुदाम ,प्रा.महेश कुलकर्णी समर्थ वाचनालयाचे ग्रंथपाल पी. वी. कदम, प्रा.डॉ.विनय भोगले ,ज्ञयराम गुरूपवार, प्रा डॉ. हणमंत लाव्हडे, प्रा.डॉ. संजय देवडे देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालयाचे कर्मचारी सह ग्रंथपाल श्रीनिवास नाईक भीम कर्णे, दीपक मंगमकर बालाजी गोविंदवार , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner